विद्या प्रसारक मंडळाचे

# के.ग.जोशी कला आणि ना.गो.बेडेकर वाणिज्य माहाविद्यालय (स्वायत्त),ठाणे.

## मराठी भाषा अभ्यास मंडळ
## (शैक्षणिक वर्ष: २०२२-२३)

**बैठक क्रमांक - ३**
**विभाग : मराठी**
**दिवस : शुक्रवार**
**तारीख : ०५ ऑगस्ट २०२२**
**वेळ : दुपारी १२.०५ वाजता**
**ठिकाण : आभासी मंच - "गूगल मीट"**

**सभेचे इतिवृत्त**

मुद्दा क्र.३.०१: मराठी भाषा आणि साहित्य विभागाच्या अभ्यास मंडळाची सभा शुक्रवार दिनांक ०५ ऑगस्ट २०२२ रोजी दुपारी १२.०५ वाजता गूगल मीट वर आभासी मंचाद्वारे (ऑनलाईन) मराठी भाषा विभागप्रमुख प्रा.संतोष लक्ष्मण राणे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.प्रा.संतोष राणे यांनी सभेचे प्रास्ताविक केले. सभेला अभ्यास मंडळाचे खालील सर्व सदस्य उपस्थित होते.

| | |
|---|---|
| डॉ.नितीनआरेकर | मा.कुलगुरू मुंबई विद्यापीठ,नामनिर्देशित सदस्य. सहयोगी प्राध्यापक.सीएचएम महाविद्यालय,उल्हासनगर |
| डॉ.राजेंद्र सांगळे | (बाह्य विद्यापीठ सदस्य,सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ) |
| डॉ.रमाकांत कराड | (बाह्य विद्यापीठ सदस्य,सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ) प्राध्यापक,मराठी भाषाविभाग,आर.एन.सी.कला,आणिजे.डी.बी.वाणिज्य आणि एन.एस.सी.विज्ञान महाविद्यालय,नाशिक रोड,नाशिक. |
| कु.काजल थळे | गुणवंत माजी विद्यार्थिनी. |
| प्रा.संतोष लक्ष्मण राणे | अध्यक्ष - मराठी भाषा अभ्यास मंडळ, विभागप्रमुख-मराठी भाषा आणि साहित्य |
| प्रा.रुपेश यशवंत महाडीक | सदस्य मराठी विभाग |
| प्रा.राजश्री माने-जाधव | सदस्या,मराठी विभाग |
| प्रा.डॉ.मुग्धा बापट( निमंत्रित सदस्य) | टॅलेंट & कल्चरल समिती प्रमुख |

मुद्दा क्र.३.०२: प्रा.रुपेश महाडीक यांनी सभा क्र.२ चा इतिवृत्तांत वाचला.पूर्वसभेत मान्यवर सदस्यांकडून कोणत्याही बदलाच्या सूचना नसल्याने प्रा.रुपेश महाडीक यांनी सेतू/मूल्यवर्धित कौशल्य विकसन अभ्यासक्रम याबाबतचा नवीन प्रस्ताव सादर करण्याची अनुमती सदस्यांकडे मागितली,सर्व सदस्यांनी यास अनुमोदन दिले.

Scanned with CamScanner

मुद्दा क्र.३.०३ पीपीटी सादरीकरणाच्या माध्यमातून 'सेतू/मूल्यवर्धित कौशल्य विकसन अभ्यासक्रम' सर्वांसमक्ष ठेवण्यात आला तो पुढीलप्रमाणे-

| |
|---|
| १) युनिकोड मराठी संगणकीय टंकलेखन आणि अक्षरजुळणी |
| २) साहित्यिक कौशल्य वर्धन कार्यक्रम (Literary Skill Enhancement Program) |
| ३) शुद्धलेखन |
| ४) भाषांतर,अनुवाद, रुपांतर/अनुवादक अभ्यासक्रम |

मुद्दा क्र.३.०४: सदर अभ्यासक्रमाची सविस्तर माहिती अभ्यास मंडळ सदस्यांना देण्यात आली. या वेळी टॅलेंट & कल्चरल समितीच्या प्रमुख डॉ.मुग्धा बापट यांनी 'साहित्यिक कौशल्य वर्धन कार्यक्रम' (Literary Skill Enhancement Program) मराठी विभागासोबत एकत्रित करण्याबाबतचा मानस व्यक्त करत सविस्तर माहिती दिली प्रस्तावित अभ्यासक्रमांची सविस्तर चर्चा करण्यात आली.यावेळी सन्माननीय तज्ञ प्राध्यापकांनी काही मौलिक सूचना करून पुढील अभ्यासक्रमाला अभ्यासमंडळाकडून मान्यता देण्यात आली.

| **संमत सेतू/मूल्यवर्धित कौशल्य विकसन अभ्यासक्रम** |
|---|
| १)साहित्यिक कौशल्य वर्धन कार्यक्रम (Literary Skill Enhancement Program) |
| २) भाषांतर,अनुवाद, रुपांतर/अनुवादक अभ्यासक्रम |

मुद्दा क्र.३.०५: सदर प्रस्तावित अभ्यासक्रमांमध्ये संमत झालेल्या अभ्यासक्रमातील 'साहित्यिक कौशल्य वर्धन अभ्यासक्रम' हा टॅलेंट & कल्चरल विभागासोबत करण्यास अनुमोदन देण्यात आले तर 'भाषांतर,अनुवाद,रुपांतर/अनुवादक अभ्यासक्रम' हा शक्य झाल्यास इतर भाषा विभागासोबत एकत्रित करण्याची विनंतीवजा सूचना करण्यात आली.ज्याला अभ्यासमंडळाने मान्यता दिली. सदर अभ्यासक्रम संमत करण्याचा एकमताने ठराव मंजूर करण्यात आला. सर्वच सदस्यांनी त्याला अनुमोदन दिले.

मुद्दा क्र.३.०६: प्रा.राजश्री माने-जाधव यांनी जोशी-बेडेकर स्वायत्त महाविद्यालयाचे विश्वस्त मंडळ,महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक, उपप्राचार्य सुभाष शिंदे, उपप्राचार्या डॉ. प्रियंवदा टोकेकर, उपप्राचार्य डॉ.महेश पाटील,ग्रंथालय प्रमुख प्रा.नारायण बारसे या सर्वांचे त्यांच्या मार्गदर्शनासाठी व सहकार्यासाठी मनःपूर्वक आभार मानले. तसेच अभ्यास मंडळाच्या सर्व सदस्यांचेही आभार मानले. अभ्यास मंडळाची सभा १ वाजून १० मिनिटांनी संपन्न झाली.

प्रा.संतोष लक्ष्मण राणे
अध्यक्ष - मराठी भाषा अभ्यास मंडळ,

प्राचार्या
डॉ. सुचित्रा नाईक

V.P.M's JOSHI BEDEKAR COLLEGE OF ARTS & COMMERCE AUTONOMOUS THANE

Scanned with CamScanner